दिनाक : २२/०९/२०२१

# अहवाल

## " 134 वा कर्मवीर जयंती सोहळा 2021- 22 "

रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनियर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालय रामानंदनगर (बुर्ली) यांचे संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांचा 134 वा जयंती सोहळा बुधवार दिनांक 22 सप्टेंबर 2021 रोजी ऑनलाईन संपन्न झाला.

या सोहळ्याचे अध्यक्ष मा. जे.के (बापू) जाधव सदस्य महाविद्यालय विकास समिती व जनरल बॉडी सदस्य प्रमुख पाहुणे मा. प्रा. निरंजन फरांदे मराठी विभाग सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा प्रमुख उपस्थिती मा. महेंद्र (आप्पा) लाड सदस्य महाविद्यालय विकास समिती व जनरल बॉडी सदस्य तसेच प्राचार्य डॉ. एल. डी.कदम साहेब, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज चे मुख्याध्यापक मा. एन. आर. जगदाळे त्याचबरोबर सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. एल. एस.पाटील तसेच महाविद्यालय विकास समिती स्थानिक व्यवस्थापन समिती रयत संकुल शिक्षक शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी विद्यार्थिनी या सर्वांच्या ऑनलाईन उपस्थितीत हा समारोह संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून व व रयत गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम साहेब यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष श्री. एस. एस. खोत यांनी तिन्ही शाखांचे अहवाल वाचन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष त्याचबरोबर प्रमुख उपस्थित मान्यवर या सर्वांचे स्वागत स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज रामानंदनगर या विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. एन .आर .जगदाळे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते माननीय प्रा. निरंजन फरांदे यांनी आपल्या भाषणामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा आढावा घेत व कर्मवीर भाऊराव पाटलांनी तत्कालीन समाजामध्ये जे प्रबोधन केले आणि तळागळातील विद्यार्थ्यांच्या साठी जी शिक्षण संस्था स्थापन केली त्या शिक्षण संस्थेचा विकास व विस्तार याची माहिती त्यांनी भाषणामध्ये दिली. त्याचबरोबर सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या त्यागातून व परिश्रमातून ही शैक्षणिक संस्था उभी राहिली त्याची देखील माहिती त्यांनी अनेक उदाहरणांमधून दिली.

त्यानंतर प्रमुख उपस्थित असलेले मा. महेंद्र (आप्पा) लाड यांनी आपल्या भाषणांमधून ते रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचे स्पष्ट केले व त्यांच्या मनामध्ये रयत शिक्षण संस्थेबद्दल असणारे प्रेम व भावना त्यांनी त्यांच्या भाषणांमधून व्यक्त केल्या.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जे.के. बापू जाधव सदस्य महाविद्यालय विकास समिती व जनरल बॉडी रयत शिक्षण संस्था सातारा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शैक्षणिक कार्याचे व त्यागाचे वर्णन केले .

त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप सौ लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालय रामानंदनगर यांच्या मुख्याध्यापिका सौ एल .एस. पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेजस चव्हाण यांनी केले.

अशाप्रकारे कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात पार पडला.

ज्युनिअर कॉलेज
विभाग प्रमुख

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.


NSS Day 2020-21 (2021-09-23
Type here to search
22°C
ENG
29/10/2021


NSS Day 2020-21 (2021-09-23
Prof. Niranjan Pharande
Type here to search
22°C
ENG
29/10/2021


पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३४ वा जयंती सोहळा (2021-09-22 at 02:38 GMT-7)
Picture in Picture
6:59 / 1:23:08


drive.google.com/file/d/1N3YpH-7K3YU3ZqOr07xUVcArvJVuv3tP/view
Type here to search
22°C
ENG
08:23
29/10/2021